राज्यातील धार्मिक सण व उत्सव इ.च्या कालावधीमध्ये परीक्षा घेणे व शाळांना सुट्टयांच्या नियोजनाबाबत.

महाराष्ट्र शासन
शालेय शिक्षण व क्रीडा विभाग
**शासन निर्णय क्रमांकः संकीर्ण-२०१५/ प्र.क्र.२०६/एसडी-२**
मादाम कामा रोड, हुतात्मा राजगुरु चौक,
मंत्रालय, मुंबई ४०० ०३२
दिनांक : ८ सप्टेंबर, २०१५

वाचा : १) शासन निर्णय, शालेय शिक्षण विभाग, क्र.एसएसएन-१०९९/ (२७/९९)/ माशि-२, दि.२२.५.२०००
२) शासन निर्णय, शालेय शिक्षण व क्रीडा विभाग, क्र.संप्रप-२००६/(१३७/०६)/ प्राशि-५, दि.३०.४.२००७
३) शासन निर्णय, शालेय शिक्षण व क्रीडा विभाग, क्र.संप्रप-२००६/(१३७/०६)/ प्राशि-५, दि.२२.६.२००७

प्रस्तावना :

१.१ बालकांचा मोफत व सक्तीच्या शिक्षणाचा अधिकार अधिनियम २००९ मधील परिशिष्टामध्ये शालेय कामकाजाचे किमान दिवस व तास पुढीलप्रमाणे निश्चित केलेले आहेत :-

१) इ.१ ली ते ५ वी साठी २०० कार्यदिन / प्रत्येक शैक्षणिक वर्षात प्रत्यक्ष अध्यापनाचे ८०० घडयाळी तास.
२) इ.६ वी ते ८ वी साठी २२० कार्यदिन / प्रत्येक शैक्षणिक वर्षात प्रत्यक्ष अध्यापनाचे १००० घडयाळी तास.

१.२ माध्यमिक शाळा संहिता नियम ५२.२ नुसार शैक्षणिक वर्षातील सर्व प्रकारच्या एकूण सुट्टया ७६ दिवसांपेक्षा जास्त देता येत नाहीत. तसेच कामाचे दिवस २३० होणे आवश्यक आहे.

१.३ राज्यातील शाळांचे भौतिक, शैक्षणिक विद्यार्थी विकास, समस्या सोडविण्यासाठी तसेच शालेय कामकाजात पालकांचा सक्रीय सहभाग व सहयोग वाढविण्यासाठी शासन निर्णय दिनांक २२.५.२००० नुसार पालक शिक्षक संघाची स्थापना करण्यात आलेली आहे. तसेच याबाबत मार्गदर्शक सूचना देण्यात आलेल्या आहेत.

उपरोक्त प्रचलित अधिनियम, नियम, मार्गदर्शक सूचना इ.च्या अनुषंगाने राज्यातील धार्मिक सण, उत्सव इ.च्या कालावधीत परीक्षा घेणे व या कालावधीत शाळांना अल्प मुदतीच्या सुट्टया देण्याबाबतच्या नियोजनाची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

**शासन निर्णय :**

राज्यातील गणेशोत्सव, दिवाळी, पर्युषण पर्व, नाताळ, ईद, इत्यादी धार्मिक सण / उत्सव कालावधीत शाळांना **अल्प मुदतीच्या सुट्टया देणे,** या कालावधीत **परीक्षा घेणे** याबाबत खालीलप्रमाणे कार्यवाही करण्याबाबत शासनाचे आदेश आहेत.

१) बालकांचा मोफत व सक्तीच्या शिक्षणाचा अधिकार अधिनियम, २००९ व शासनाचे प्रचलित आदेश, नियम, मार्गदर्शक सूचना यानुसार आवश्यक किमान शैक्षणिक दिवस **शाळेचे कामकाज** होईल या अटीच्या अधीन राहून **शाळांच्या सुट्टयांचे** नियोजन व त्यामध्ये बदल करण्याचा निर्णय पालक-शिक्षक संघाच्या बैठकीमध्ये मान्य केला जावा. या अटींचे उल्लंघन होणार नाही याची दक्षता संबंधित जिल्हयाच्या शिक्षणाधिकारी (प्राथमिक / माध्यमिक) यांनी घ्यावी.

२) शिक्षणाधिकारी (प्राथमिक / माध्यमिक) यांनी स्थानिक ठिकाणच्या गरजेनुसार **शाळा व्यवस्थापन समिती / पालक शिक्षक संघ** यांच्या सहमतीनुसार व शिफारशीनुसार गणेशोत्सव, दिवाळी, पर्युषण पर्व, नाताळ, ईद व अन्य धार्मिक सण / उत्सव कालावधीत **चाचणी परीक्षांचे आयोजन** करु नये.

३) शिक्षणाधिकारी (प्राथमिक / माध्यमिक) यांनी, अशा कालावधीमध्ये विद्यार्थ्यांच्या होणाऱ्या दीर्घकालीन अनुपस्थितीमुळे अन्य वेळी **परीक्षा** घेण्याबाबत व **अभ्यास भरुन** काढण्याबाबत नियोजन करावे व त्यानुसार सर्व शाळांना सूचना द्याव्यात.

२. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेत स्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा सांकेतांक २०१५०९०८१७२३३०४४२१ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकीत करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नांवाने.

Ramchandra Ganpat Gunjal

Digitally signed by Ramchandra Ganpat Gunjal
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=Deputy Secretary, postalCode=400032, st=Maharashtra, serialNumber=dc74b0493b4979ad0aa76763f873c23fa35ecb44970562d4aa14a832b6357e54, cn=Ramchandra Ganpat Gunjal
Date: 2015.09.08 18:05:38 +05'30'

(रा. ग. गुंजाळ)
शासनाचे उप सचिव.

**प्रत,**

१. मा.राज्यपाल यांचे सचिव, राजभवन, मुंबई.
२. मा.मुख्यमंत्री यांचे प्रधान सचिव, मंत्रालय, मुंबई.
३. मा.मंत्री (शालेय शिक्षण) यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई.
४. मा.मुख्य सचिव, महाराष्ट्र राज्य यांचे उप सचिव, मंत्रालय, मुंबई.
५. मा.प्रधान सचिव (शालेय शिक्षण व क्रीडा) यांचे स्वीय सहाय्यक.
६. आयुक्त (शिक्षण), महाराष्ट्र राज्य, पुणे.
७. सर्व महानगरपालिकांचे आयुक्त.
८. सर्व मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद.
९. आयुक्त, आदिवासी विकास, नाशिक.
१०.आयुक्त, समाज कल्याण, पुणे.